# संत जनाबाईच्या थालीपाक आख्यानकाव्यातील श्रीकृष्णभक्ती

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डीगोळे,**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव

संत जनाबाई या मराठी संत परंपरेतील एक भावपूर्ण काव्य लिहिणाऱ्या कवयित्री होत्या. संत नामदेव महाराज यांच्या प्रेरणेतून ज्यांनी-ज्यांनी काव्य लिहिले त्यात चोखामेळा, संत जनाबाई, परिसा भागवत, इत्यादीचा समावेश होतो. संत जनाबाई नामयाची दासी, नामयाची जनी असे जनाबाई म्हणवून घेत असत. जनीच्या आई-वडिलांनी लहान वयातच जणीला पंढरपूर येथे संत नामदेवाकडे आणून सोडले आणि जनी नामदेवांच्या कुटुंबातील एक घटक बनली. नामदेवाच्या घरी दळण- कांडण, झाडलोट, धुणी-भांडी करणाऱ्या जनीच्या वाणीतून उत्कृष्ट कविता निर्माण झाल्या. जनीच्या दळण-कांडनातून तिचे अभंग निर्माण झाले. काव्य निर्मितीसाठी विद्वत्तेची गरज नाही कोणत्याही शास्त्राचे अध्ययन करण्याची गरज नाही हे जनीच्या कवितेने सांगितले आहे. मराठीला संत कवयित्रींची मोठी परंपरा आहे. जनी, राजाई, निर्मला, गुणाई, कान्होपात्रा या संत कवयित्रीची परंपरा तेराव्या शतकात आढळते. महदंबा ही मराठीतील आद्यकवियीत्री होत. चक्रधरांच्या सहवासात आणि अनेक विद्वानाच्या संगतीत येण्यामुळे महदंबा धवळयांची रचना करते. यात मुळीच आश्चर्य नाही किंवा मुक्ताई, ज्ञानेश्वर महाराज, निवृत्तीनाथ इत्यादी संताच्या कुटुंबातीलच एक असल्यामुळे मुक्ताईने आपल्या अभंगातून गुढ अनुभव व्यक्त करावेत यातही फारसे आश्चर्य नाही. पण जनीने भावमधुर कविता लिहिणे हे मात्र आश्चर्य आहे, कारण जनीला तशी कोणतीच पार्श्वभूमी नव्हती. आई नाही, वडील नाही, भाऊ-बहीण कोणीच नाही संसार यांचा संबंधच आला नाही. संत नामदेवाच्या घरी काबाडकष्ट करावेत आणि सिण आला म्हणजे पांडुरंगाला आळवावे. एवढेच जनीला माहीत होते. पण त्यातूनच जनीचे उत्कट अभंग निर्माण झाले जवळपास 300 पेक्षा अधिक जनीचे अभंग आहेत. त्यात पांडुरंगासी नाते जोडले आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा इत्यादी संतांचे प्रेम जनीने आपल्या अभंगातून व्यक्त केले आहे. पंढरीचा महिमा रसाळ शब्दात गायला आहे. पंढरीचे वाळवंट संतांच्या कीर्तनाने कसे फुलून जाते याची दृश्ये जनीच्या अभंगात आढळतात. पांडुरंगासाठी जनीने आपली सर्व वाणी समर्पित केली आहे. या बरोबरच जनीने हरिश्चंद्राख्यान, थाली पाक आख्यान ही दोन आख्याने लिहिली त्यात थालीपाक आख्यान हे एक रसाळ सुलभ आणि भावपूर्ण असे आख्यान आहे. हे आख्यान मुळात महाभारतातील वनपर्वात आले आहे. पांडव वनवासात असताना सुर्याने प्रसन्न होऊन पांडवांना एक थाळी दिली. त्या थालीच्या प्रभावाने विनासायास उत्तम पक्वान्ने आणि भोजन पदार्थ अगणित स्वरूपात निर्माण होत असत. पांडव त्या थाळीमुळे याचकांना दिवसभर अन्नदान करीत असत. सूर्यास्त होताच ती थाळी धुऊन ठेवली जात असे मग मात्र सूर्योदय होईपर्यंत या थाळीचा प्रभाव पडत नसे.

ही वार्ता दुर्योधनाला समजली तेव्हा पांडवांचे सत्वहरण करण्यासाठी काहीतरी युक्ती केली पाहिजे. या विचारात दुर्योधन असतानाच तेथे दुर्वासऋषी प्रगट झाले. दुर्वास रागीट होते याचा चांगला उपयोग करून घेता येईल असे दुर्योधनाला वाटले. त्याने दुर्वास यांचे उत्कृष्ट स्वागत केले दुर्वास प्रसन्न झाले आणि वर माग असे दुर्योधनास म्हणाले. दुर्योधन म्हणाला की, आपण वनात जावे आणि पांडवाकडे इच्छाभोजन मागावे आणि ते इच्छाभोजनन मिळाल्यास शाप द्यावा असा वर आपण मला द्यावा. दूर्वासाने संमती दिली आणि आपल्या असंख्य ऋषीसह दुर्वास ज्या ठिकाणी पांडू होते, त्या वनात मध्यरात्री प्रगट झाला त्या सर्वांना पाहून झोपी गेलेले पांडव जागे झाले. त्यांनी ऋषींना वंदन केले. ऋषींनी भोजनाची इच्छा व्यक्त केली तेव्हा मात्र धर्मराजव भीम कोड्यात पडले कारण एवढ्या मध्यरात्री हजारो लोकांना जेवण देणे शक्य नव्हते. सूर्यथाळीचा प्रभाव रात्र असल्यामुळे शक्य नव्हते. द्रौपदीने कृष्णाचा धावा केला व ती वृंदावनाजवळआली व हात जोडून श्रीकृष्णाचा धावा करू लागली. सर्व ऋषी रागावले आणि आम्ही स्नान करून येईपर्यंत आमचे पात्र वाढलेले दिसले पाहिजे नाही तर आम्ही तुम्हाला शाप देऊ, भस्म करू असे म्हणून दुर्वास व इतर ऋषी गंगेच्या स्नानासाठी जातात. पण इकडे मात्र सर्व पांडवांना पुढे काय होईल याची काळजी पडली आपले सत्वहरण होण्याची वेळ आली आहे. हे पाहून द्रौपदीने निर्वाणीचा धावा केला. त्यावेळी द्वारकेत श्रीकृष्ण भोजनास बसला होता, रुक्मिणीने कृष्णाचे ताट तयार केले. इतक्यात द्रौपदीचा धावा कानी येताच कृष्णाने ताट बाजूला सारले आणि आपल्या बहिणीसाठी तो तात्काळ धावुन आला. वृंदावनाजवळ द्रोपदी उभी होती तेवढ्यात तिला तिच्यासमोर सावळा कृष्ण दिसला. द्रौपदीला खूप आनंद झाला तिने कृष्णाला लोटांगण घातले आणि विनंती केली की, हे कृष्णा तूच माझ्या मनाला समाधान देऊ शकतोस. आता थोड्याच वेळात ऋषी येतील आणि भोजन मागतील ते संकट तू निवारण कर. हे ऐकून श्रीकृष्ण हसू लागला. एवढ्या अपरात्री अन्न कसे देता येईल. तो म्हणाला ते ऋषिचे म्हणणे बाजूला ठेव. त्यापूर्वी मला भूक लागली आहे. तुझा धावा ऐकून मी जेवता-जेवता ताट बाजूला सारून तुझ्या भेटीसाठी आलो. तेंव्हा मला अगोदर खाण्यासाठी कांहीतरी दे हे ऐकून द्रोपदीला हसू आले.एक संकट टाळण्यासाठी कृष्णाला बोलावले, तर त्याने दुसरे संकट उभे केले. भुकेल्या कृष्णाला काय द्यावे हा प्रश्न द्रौपदीसमोर निर्माण झाला. हे कृष्णा माझ्याजवळ फक्त एक भाव आहे तो तुझ्या पायी ठेवते. याठिकाणी जनी आपल्याला दिसते संत हे आपले अंतरंग अशा रीतीने व्यक्त करतात या ठिकाणी द्रोपदी असे म्हणत नाही, तर जनी म्हणते की, तुला देण्याकरता माझ्याजवळ भाव आहे यातून जनीचे अंतरंग दिसते. यापेक्षा माझ्याजवळ काही नाही असे म्हणून द्रौपदीने आपल्याजवळची थाळी देवाला दाखवलीथाळीत काहीही नव्हते दोन्ही बाजूंनी कृष्णाने थाळी पाहिली. पण एका ठिकाणी कोपऱ्यात एक भाजीचे पान होते. श्रीकृष्णाने हात पसरला आणि द्रौपदीने ते भाजीचे पान त्याच्या हातावर ठेवले आणि त्या सुंदर द्रौपदीने कृष्णाला त्या पानावरच संतुष्ट होण्याची विनंती केली आणि खरच कृष्ण तृप्त झाला व त्याने ढेकर दिली कृष्ण तृप्त झाला. म्हणजे त्रैलोक्य तृप्त झाले. त्यानंतर कृष्णाने आपल्या मायावी शक्तीने प्रचंड अन्नाचे पर्वत निर्माण केले. अनेक प्रकारची मिष्टान्ने निर्माण केली. सुग्रास, गरमागरम अण्णाच्या वाफा आकाशात जात होत्या हे पाहून सर्वांनाच नवल वाटले. इकडे गंगेच्या काठी श्रीकृष्णाने आणखी एक नवल निर्माण केले. गंगेच्या

काठी रत्नजडीत मंडप आणि त्या मंडपात ऋषींच्या पंगती जेवावयास बसले आहेत. धर्मराजासहित सर्व पांडव अनेक प्रकारचे दिव्य अन्न ऋषींना वाढत आहेत. त्या अन्नाच्या गोडीत आपण किती जेवत आहोत याचे भान ऋषींना राहिले. नाही द्रौपदी देखील सुग्रास अन्न ऋषींना वाढत होती. सर्व ऋषी पोटभर जेवले. सगळ्यांनी आनंदाचे ढेकर दिले. जेवणानंतर ते सर्वजण मृदू शय्येवर झोपी गेले. तेवढ्यात पाच पांडव आणि द्रौपदी तेथून अदृश्य झाले. कुणालाच काही कळले नाही. गंगेवर गेलेल्या ऋषींना बोलावण्यासाठी भीम निघाला तो गंगेच्या काठी आला त्याने सर्व ऋषींना भोजनास येण्याची विनंती केली. पण सर्व ऋषी म्हणाले आम्ही जेवून तृप्त झालो. आहोत आम्हाला जेवण्याची अजिबात इच्छा नाही. खरे म्हणजे त्या दुष्ट दुर्योधनाने आम्हाला तुमच्याकडे पाठविले पण आमची चूक झाली. मागे राजा आंबरीष याचे सत्वहरण करण्यासाठी आम्ही प्रयत्न केला. पण त्या प्रयत्नात आमची फजिती झाली. असे म्हणून दुर्वास आणि सर्व ऋषी धर्मराजास आशीर्वाद देऊन तेथून निघून गेले. त्याप्रमाणे श्रीकृष्णाने वनवासात पांडवांचे रक्षण केले नेहमी तो भक्तांचे रक्षण करतो त्याच्या पीतांबराची छाया निरंतर भक्तावर असते. श्रीकृष्णाने पांडवाची आज्ञा घेतली आणि देव द्वारकेस गेला. येथे थालीपाक संपले असे जनीने म्हटले आहे. यानंतर घोषयात्र (दुसऱ्याच्या प्रांतातील गायी पळवून आणणे) निरूपण येणार आहे असे जनीने म्हटले आहे. ब्राह्मण ऋषी यांची परमार्थ भावाने पूजा करण्याचा आणि अन्नदान करण्याचा ज्यांना योग येतो. त्यांचे आई-वडील धन्य आहेत. त्यांना नम्रतेने वंदन करून जनीनेही थालीपाक अख्यान संपविले आहे. मराठी पंडित कवींनी (जसे नरेंद्र, दामोदर व वामन पंडित) आख्यान रचना केली. पण संतांच्या आख्यान रचनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या आख्यानाची भाषा होय. संतांनी जी पौराणिक आख्याने लिहिली ती प्रामुख्याने अभंग व ओवीतून लिहिली. जनीने तर अभंगासारख्या धावत्या रचनेचा स्वीकार केला आणि जनीची भाषा मुळातच साधी व सोपी आहे संतांनी आपले सर्व वांङमय सर्वसामान्य लोकांना समजावे या हेतूने संतांनी आख्यानातील संतांची वाणी मुळातच लोकसम्मुख होती समाजातील आठरापगड जातीतील स्त्रियांना अशिक्षितांना समजावे या हेतूने संतांनी आख्याने लिहिली. सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेचा अवलंब जनीने केला या उलट पंडित कवींची भाषा अलंकारप्रचुर व पांडित्य प्रचुर होती. या अख्यानात जनीने श्रीकृष्णाची भक्तवत्सल प्रतिमा निर्माण केली आहे. परमेश्वर हाच भक्तांचा सखा आहे, बंधू आहे, माता-पिता तोच आहे भक्तांचा सर्वस्व देव आहे. म्हणून भक्तांचे संकट निवारण करण्यासाठी देव धावून येतो. दुर्वास ऋषी मध्यरात्री पांडवांच्या आश्रमात आले आणि त्यांनी भोजनाची इच्छा व्यक्त केली ती इच्छा पूर्ण न केल्यास शाप देऊन सर्वांना भस्म करुन टाकेन अशी भीती घातली त्यावेळी द्रौपदीने कृष्णाचा धावा केला त्याचे वर्णन करताना जनी लिहिते. “करचरण प्रक्षाळूनी, उभी हेली वृदावनी, जोडूनिया करकमळ, म्हणे धाव रे गोपाळ, कृपणा पाहतोसी काय, सत्वहाणी होत आहे.” द्रौपदीने अशाप्रकारे कृष्णाचा धावा केला श्रीकृष्ण त्यावेळेस द्वारकेत भोजनास बसला होता. रुक्मिणीने त्याच्यासाठी ताठ सजविले होते पण द्रौपदीचा धावा कानी पडताच ताट बाजूला सारून श्रीकृष्ण बहिणीसाठी धावून आला आणि द्रौपदीसमोर उभा राहिला. श्रीकृष्णाचे रूप त्यावेळी कसे दिसत होते. हेही जनीने वर्णन केले आहे. श्रीकृष्ण रत्नाच्या पलंगावर झोपला आहे. रुक्मिणी त्याचे पाय चोळत आहे. एवढ्यात द्रौपदीचे शब्द कानावर पडले आणि

लगेच श्रीकृष्ण तातडीने निघाला. याचे वर्णन करताना जनीने "कानी पडियले द्रोपदीचे बोल, "उभे घननीळ तातडीने, रुक्मिणी म्हणे ऐक एक गोष्ट, पडिले संकटी तान्हे माझे, टाकीला गरुड अनवाणी पाय , जनी म्हणे माय धाविंयली" श्रीकृष्ण आणि द्रौपदी यांच्यातील संबंध आई आणि तान्हे बाळ यातून जनीने सूचित केला आहे. द्रौपदीसाठी श्रीकृष्ण धावून आला आणि द्रौपदीला अतिशय आनंद झाला त्याने आपले संकट निवेदन केले. पण श्रीकृष्णाने गमतीने त्याकडे दुर्लक्ष केले आणि आपल्याला भूक लागल्याचे नाटक केले आपण जेवता जेवता तिथून आलो तेव्हा लवकर काहीतरी खायला दे असे कृष्ण म्हणाला द्रौपदी आणि कृष्ण यांच्यातील संवाद मानवी वाटतो भुकेला भाऊ आणि त्याच्या भुकेचे निवारण करण्यास असमर्थ असलेली बहीण अगदी स्वाभाविक वाटते पण द्रौपदीने उरलासुरला देठ कृष्णाच्या हातावर ठेवताच देव तृप्त झाला. देवाला पंचपक्वान्ने नको असतात तो केवळ भावाचा भूकेला आहे. अतिशय भक्तीभावाने द्रौपदीने त्यास भाजीचे पान दिले आणि तेवढ्यावरच तो संतुष्ट झाला. देवभक्तीतील अपूर्व संबंध जनीने चित्रित केला. कृष्णाने आपल्या मायावी शक्तीने गंगेच्या काठावर सर्व ऋषींना सुग्रास अन्नाने तृप्त करून दुर्वास ऋषींची खोड मोडली होती व पांडवांचे सत्वरक्षण केले. अशा तऱ्हेने देव भक्तांचा रक्षण करता आहे. संकट काळात देव आपल्या पीतांबराची भक्तावर सावली करतो आणि त्यांना दिलासा देतो. अशा स्वरुपात जनीने कृष्णाची प्रतिमा रेखाटली आहे आख्यानात जनिने श्रीकृष्ण आणि द्रौपदी यांच्या संवादात स्वाभाविकपणा आणला आहे. द्रोपदी श्रीकृष्णाचा धावा करते तोही अंर्तभावनेने आता लवकरच हे ऋषी स्नान करून येतील आणि अन्न नाही हे पाहताच ते आम्हाला भस्म करतील तेव्हा आमची लाज राखा. "कोणी नाही रे निर्वाणी,म्हणे नाम्याची जनी" अशा कठीण प्रसंगी आमचे असे कुणीही नाही. तेव्हा तूच आता धाव श्रीकृष्ण द्रौपदीचा धावा ऐकून धावून आला द्रौपदी म्हणाली, हे कृष्णा तूच माझ्या मनाचा आधार आहेस. आता लवकरच ऋषी भोजनासाठी येतील तोपर्यंत माझ्या शरीरात प्राण असेल पण देव हा नाटकी आहे तो हसून म्हणाला ते काही मला सांगू नकोस "स्वस्थ आहे माझे मन, क्षुधा लागली दारुण, ताठी विस्तारी ला मेवा, तुझा ऐकुनिया धावा, न जेविता आलो येथे, बहुजाहलो क्षुधाक्रांत" हे ऐकून द्रोपदी आगतिक झाली. कृष्णाला खायला देण्यासाठी काहीच नव्हते ती कृष्णाला म्हणाली, "एक भावतुझे पायी, या वेगळे काही नाही" अंतरंगात फक्त शुद्ध भाव आहेत. यापेक्षा माझ्याजवळ काही नाही तरी पण कृष्णाने हट्ट धरला त्या थाळीत काहीतरी असेलच असे तो म्हणाला द्रौपदीने ती थाळी कृष्णास दाखविली. कृष्णाने सर्व बाजूने शोध घेतला आणि कोठेतरी एक भाजीचे पान आढळले आणि त्यासाठी द्रोपदीसमोर हात पसरला मोठ्या भक्तिभावाने द्रौपदी म्हणाली, "म्हणे पावो विश्वंभर, बोले द्रोपदी सुंदर"

थोडक्यात या आख्यानात द्रौपदी आणि कृष्ण यांचा संवाद देव आणि भक्तांचा तर आहेच पण त्याच बरोबर भावाचा अगतिक बहिणीशी केलेला हा संवाद आहे. देवाच्या अवतारीत्वाच्या व मोठेपणाच्या कल्पनापासून हा संवाद अतिशय दूर गेला आहे. यात एक लडिवाळ घरगुतीपणा जाणवतो. हे जनीच्या वर्णणाचे खास वैशिष्ट्य आहे. द्रौपदीने कृष्णाचा धावा करताच कृष्ण आपल्या बहिणीसाठी धावून आला. त्यावेळी द्रौपदी वृंदावनाजवळ उभी होती. अकस्मात श्रीकृष्ण आपल्यासमोर उभा आहे. असे द्रौपदीने पाहिले. त्या कृष्णाचे रूप वर्णन जनीने खालील शब्दात केले आहे. "मुकुट कुंडले मेखला मेखला, वैजयंती वनमाला, शंख चक्र आयुधे करी, दिसे

घवघवीत हरी, झळके पीतांबर कासे, नयनी कोंदला प्रकाशे, पहाता आनंदली मनी, म्हणे नामयाची जनी" अगदी मोजक्या शब्दात कृष्णाची मनोहरी प्रतिमा जनीने चित्रित केली आहे विशेषतः देवाच्या पीतांबराचे तेज डोळ्यात मावत नव्हते. ती कृष्णाचे रूप पाहून द्रोपदी आनंदित झाली. गळ्यात वैजयंती माळा, मुगुट, कानातील कुंडली, मेखला, कमरपट्टा याशिवाय हातात शंख, चक्र इत्यादी आयुधे असलेले कृष्णाचे रूप अतिशय मनोहर दिसत होते. आख्यान कवितेत जी काही रूपे वर्णने असतात ती बहुतेक शृंगार, विर, करूण या रसास पोषक असतात. पण संतांच्या कवितेतील रूपवर्णने, प्रसंगवर्णने शांतरसात परिणत होतात. थालीपाक आख्यान या छोट्याशा रचनेत जनीने विनोदी प्रसंगाचेही वर्णन केले आहे. कृष्णाने आपल्या मायावी शक्तीने गंगेच्या काठी रत्नजडीत मंडप उभा केला. ऋषींच्या पंगती बसविल्या आणि विविध प्रकारचे रुचकर व दिव्य अन्न पाच पांडव आणि द्रौपदी ऋषींना वाढत होते. असे दृश्य दिसू लागले. ते इतके रुचकर होते की सर्व ऋषींना वाटले आपल्या डोक्याला तोंडाचे छिद्र असते तर किती बरे झाले असते त्यामुळे आपण खूप अन्न खाऊ शकलो असतो. या प्रसंगाचे वर्णन करताना जनी लिहिते "म्हणती माया असते तोंड| अन्न भक्षीते उदंड || कैची पोटे आमची लहान |गोड धर्माचरणे अन्न || उदरे सागराच्या ऐशी| करून यावे धर्मा पाशी || तृप्ती द्रौपदीचा हाते |नित्य भक्षाया अन्न हे|| वंदन करवेना तळी | वरूनी चंद्राची मंडळी|| चंद्री लागली नेत्रा |कोण सांभाळीते धोत्रा|| तरी आवळी भोजनी | म्हणे नामयाची जनी|| खादाड ब्राह्मणांचे एक हस्यास्पद चित्र जनीने रेखाटले आहे. या प्रसंगाच्या अगोदर पांडवांना शाप देऊन भस्मसात करण्याची भिती दाखवणारे ऋषी स्वत:च कसे फजित झाले हे जनीने चित्रीत केले आहे. थालीपाक आख्यानात जनीचे अंतरंग प्रतीबिंबीत झाले आहे. एक साधी भोळी निरक्षर स्त्री पण या काव्यातून एक कथा सांगताना तिचे अंतरंग अनेक ठिकाणी उमटले आहे. उदा- द्रौपदीच्या असाहाय्य अवस्थेत जनी स्वतःला पहात असते. कारण जनीला देखील जगात देवावाचून कोणीही नव्हते. देवाचे स्मरण करताच तो धावून येत असे व तिचे दळणकांडण करत असे त्या प्रसंगीचे देवाचे रूप जनीच्या डोळ्यासमोरच असे व ते वर्णन जनीच्या आख्यानात श्रीकृष्णाच्या रूपवर्णनात प्रत्ययास येते. जनीला हा रोजचा अनुभव होता गेल्या जन्मी देवाला बोलवायचे आणि देवाने मुकुट कुंडले वैजयंती माळा इत्यादी वैभवा सह जनीच्या झोपडीत यायचे. अगदी हाच अनुभव द्रोपदीच्या निमित्ताने जणींने व्यक्त केलेला आहे द्रौपदीचा आणि कृष्णाचा संवाद हा एका परीने जनीचा व पांडुरंगाचा संवादच होय. स्त्रीसुलभ भावना जनीच्या खालील रचनेतून व्यक्त होतात. जसे "रुक्मिणी म्हणे ऐक एक गोष्ट|पडिले संकटी तान्हे माझे, टाकीला गरुड अनवाणी पाय| जनी म्हणे माय धाविनली रुक्मिणी कृष्णाला म्हणाली, माझे तान्हे बाळ संकटात पडले आहे श्रीकृष्ण अनवाणी पायाने निघाला बाळासाठी माय धावत आली. असे वर्णन जनीसारखी स्त्रीच करू शकते. द्रोपदी सारखी भक्त म्हणजे तान्हे वासरूच आहे आणि तिथे संकट निवारण करण्यासाठी ही माय धावत निघाली. बोलीभाषेचा वापर करून जनिने आख्यानाचे सौंदर्य वाढवले आहे उदाहरणार्थ भिम सर्व ऋषींना भोजनास पाचारण करण्यासाठी गंगेकाठी येतो त्याने सर्व ऋषींना भोजनास येण्यास विनंती केली तेव्हा सर्व ऋषी म्हणाले- "म्हणती बापाऐसे नव्हे |पोट आहे किंवा काय, आता स्वस्त प्रसादे | तृप्त झाली ऋषिवृंदे या वर्णनात ऋषी म्हणाले आमचे पोट आहे किंवा काय आम्ही जेऊन तृप्त झालो आहोत. यासारख्या रचनेत बोलीभाषेचे सौंदर्य दिसते.

श्रीकृष्णाने पांडवाचे रक्षण केले तो दीनानाथ आहे. जनीने श्रीकृष्णसाठी अर्थपूर्ण संबोधने वापरली आहेत. पांडव हे वनवासात दिन झाले होते त्या दिन पांडवाच्या रक्षणासाठी श्रीकृष्ण दीनानाथ बनला हरी, गोपाळ, सावळा, घननीळ, नारायण, भगवंत, विश्वंभर, श्रीपती, श्रीहरी, देव अशा अर्थपूर्ण संबोधनाने जनीचे भावगीतच आहे. द्रोपदीच्या माध्यमातून जनी आपल्या भावना व्यक्त करीत असते. भक्त संकटसमयी देवाचा धावा करताच देवही भक्तावर आपल्या कृपेची सावली निर्माण करते. हे वर्णन करताना जनी म्हणते - "शंख चक्र आयुधे करी, छाया पितांबर करी भक्तांना संकटाची झळ लागू नये. म्हणून देव आपल्या पितांबराची सावली करतो. ही कल्पना स्त्रीसुलभ अशी कल्पना आहे. कडेवरच्या बाळाला उन्हाची झळ लागू नये म्हणून आई ज्याप्रमाणे पदराची सावली करते व बाळाचे रक्षण करते तद्वतच देव म्हणजे भक्तांची माउली आहे तो भक्तांना संकटप्रसंगी आपल्या कृपेने ते संकट निवारण करतो. तो भाव जनीने स्त्रीसुलभ अशा भाषेत व्यक्त केला आहे. संपूर्ण कथानकाचा ओघ कुठेही खंडित होत नाही. अशा पद्धतीने जनीने हे निवेदन केले आहे. अभंगासारखे धावते वृत्त वापरल्यामुळे कथा सतत प्रवाही असते. तसेच भाषेच्या सोपेपणामुळे ही कथा वाचकांना व श्रोत्यांना सहजपणे आकलन होते. द्रौपदीच्या हातच्या गोड गोड अन्नाने दुर्वासासारख्या ऋषीच्या मनातही परिवर्तन झाल्याचे दाखविले आहे थोडक्यात देवांचे भक्ता वरील प्रेम आणि त्यातून निर्माण होणारा भक्तिरस हा जनीच्या थालीपाकचा एक उत्कट परिणाम आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) डॉ.अ. ना. देशपांडे, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, भाग दूसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, 1996
2) प्र.न. जोशी,प्राचीन मराठी वाग्ड्मयाचा विवेचक इतिहास, प्रसाद प्रकाशन,द्वितीयावृत्ती, 1978
3) ल. रा. नसिराबादकर,प्राचीन मराठी वाग्ड्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती, 1997
4) सुहासकुमार बोबडे, संत जनाबाईंच्या निवडक अभंगाचा पुनर्विचार, शांति पब्लिकेशन्स,पुणे, प्रथमावृत्ती, 2018
5) सुग्राम पुल्ले,महानुभाव आणि वारकरी साहित्य, सूर्यामुद्रा प्रकाशन, नांदेड,प्रथमावृत्ती, 2016
6) इंद्रजीत भालेराव, लोककहाणी जनाबाईंची, साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2012
7) (संपा.) सचिन परब/ श्रीरंग गायकवाड,रिंगण, संत जनाबाई विशेषांक, रिंगण प्रकाशन,प्रथमावृत्ती, 2015
8) (संपा.) विद्यासागर पाटणकर,मराठी संतकवयित्रींचा इतिहास, साहित्य अकादमी पुणे,प्रथमावृत्ती, 2015
9) डॉ. यशवंत साधुसरांनी केलेले मार्गदर्शन, इ. स. 2002.